लोकमत

# विद्यापीठ 'युजीसी'च्या 'कॅटेगरी-वन'मध्ये दाखल

## ऑनलाईन अभ्यासक्रम राबविण्यास पात्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाला युजीसीने (विद्यापीठ अनुदान आयोग) 'कॅटेगरी-वन' विद्यापीठाचा दर्जा बहाल करण्यात केला आहे. त्यामुळे ऑनलाईन अभ्यासक्रम राबविण्यास विद्यापीठ पात्र ठरले आहे.

युजीसीने विद्यापीठांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याचा निर्णय २०१८ मध्ये घेतला. त्यानुसार 'नॅक' (बंगळुरू) यांचे ३.५१ सीजीपीए गुणांकन आणि त्यावरील गुणांकनप्राप्त विद्यापीठांसाठी 'कॅटेगरी-१', ३.२६ ते ३.५० या दरम्यान गुणांकनप्राप्त विद्यापीठे 'कॅटेगरी-२' आणि त्या व्यतिरिक्त सर्व विद्यापीठे 'कॅटेगरी-३' अशी ही श्रेणी रचना करण्यांत आली आहे. विद्यापीठाला नॅकच्या ३.५२ सीजीपीए गुणांकनासह 'ए-प्लस प्लस' मानांकन प्राप्त झाले आहे. त्यामुळे 'कॅटेगरी-वन' दर्जा प्रदान करण्यात आला आहे. त्यामुळे युजीसीच्या अनेकविधी सोईचीसुविधा प्राप्त होण्यास विद्यापीठ पात्र ठरले आहे. दूरशिक्षण केंद्राला युजीसीकडून सलग पाच वर्षांसाठी मान्यता मिळाली आहे. यापूर्वी दरवर्षी ही प्रक्रिया करावी लागत असे. त्याचप्रमाणे, विद्यापीठास स्वतःचे संचलित महाविद्यालय चालवावयाचे असल्यास त्यासही मान्यता मिळू शकते, असे कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के यांनी सांगितले.



दर्जा वाढल्याने शिवाजी विद्यापीठ आता ऑनलाइन अभ्यासक्रम राबविण्यासही पात्र ठरले आहे. त्यानुसार, विद्यापीठ आता पुढे जात असून, आवश्यक कन्टेन्ट (आशय) विकसित करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. नजीकच्या काळात याचे आणखीही लाभ विद्यापीठाला पर्यायाने विद्यार्थ्यांना होतील.

\- डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 SEP 2022 पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ यूजीसीच्या 'कॅटेगरी-वन' मध्ये दाखल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाला यूजीसीकडून (विद्यापीठ अनुदान आयोग) 'कॅटेगरी-वन' दर्जा बहाल करण्यात आला आहे. त्यामुळे ऑनलाईन अभ्यासक्रम राबविण्यास विद्यापीठ पात्र ठरले असल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली.

यूजीसीने विद्यापीठांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याचा निर्णय २०१८ मध्ये घेतला. त्यानुसार 'नॅक' (बंगळुरू) यांचे ३.५१ सीजीपीए गुणांकन आणि त्यावरील गुणांकनप्राप्त विद्यापीठांसाठी 'कॅटेगरी-१', ३.२६ ते ३.५० यादरम्यान गुणांकनप्राप्त विद्यापीठे 'कॅटेगरी-२' आणि त्याव्यतिरिक्त सर्व विद्यापीठे 'कॅटेगरी-३' अशी ही श्रेणीरचना करण्यात आली आहे.विद्यापीठाला नॅकच्या सीजीपीए गुणांकनासह 'ए-प्लस प्लस' मानांकन प्राप्त झाले आहे. त्यामुळे यूजीसीकडून विद्यापीठाला 'कॅटेगरी-वन' दर्जा प्रदान करण्यात आला आहे. त्यामुळे यूजीसीच्या अनेकविधी सोयी-सुविधा प्राप्त होण्यास विद्यापीठ पात्र ठरले आहे.

## ऑनलाईन अभ्यासक्रम राबविण्यास पात्र

दर्जा वाढल्याने शिवाजी विद्यापीठ आता ऑनलाईन अभ्यासक्रम राबविण्यासही पात्र ठरले आहे. त्यानुसार विद्यापीठ आता पुढे जात असून, आवश्यक कन्टेन्ट विकसित करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. नजीकच्या काळात याचे आणखीही लाभ विद्यापीठाला पर्यायाने विद्यार्थ्यांना होतील.

-कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

पुढारी

# शिवाजी विद्यापीठास यूजीसीकडून 'कॅटेगरी-१' दर्जा

## अनुदानाबरोबरच स्वायत्तता मिळणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाला नुकताच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने 'कॅटेगरी-१' विद्यापीठाचा दर्जा बहाल करण्यात आला आहे. विद्यापीठास आता अनुदानाबरोबरच विविध गोष्टींची स्वायत्तता मिळणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.



विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यापीठांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याचा निर्णय २०१८मध्ये घेतला. त्यानुसार 'नॅक' (बंगळूर) यांचे ३.५१ सीजीपीए गुणांकन व त्यावरील गुणांकन प्राप्त विद्यापीठांसाठी 'कॅटेगरी-१', ३.२६ ते ३.५० या दरम्यान गुणांकनप्राप्त विद्यापीठे 'कॅटेगरी-२' व त्याव्यतिरिक्त सर्व विद्यापीठे 'कॅटेगरी-३' अशी ही श्रेणी रचना करण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठास नॅकच्या ३.५२ सीजीपीए गुणांकनासह 'ए++' मानांकन प्राप्त झाले आहे. त्यामुळे यूजीसीकडून विद्यापीठाला 'कॅटेगरी-१' दर्जा प्रदान करण्यात आला आहे. यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनेकविध सोयी-सुविधा प्राप्त होण्यास विद्यापीठ पात्र ठरले आहे. राज्यातील शिवाजी पान २ वर ▸

## शिवाजी विद्यापीठास यूजीसीकडून 'कॅटेगरी-१' दर्जा

**(पान १ वरून)** सोयीसुविधा प्राप्त होण्यास विद्यापीठ पात्र ठरले आहे. राज्यातील शिवाजी विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठांचा यात समावेश आहे. विद्यापीठ आता पुढे जात असून आवश्यक कन्टेन्ट विकसित करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. नजीकच्या काळात याचे आणखी लाभ विद्यापीठास पर्यायाने विद्यार्थ्यांना होतील, अशी आशा कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली.

**दूरशिक्षण विभागास सलग पाच वर्षांसाठी मान्यता**

विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राला यूजीसीकडून सलग पाच वर्षांसाठी मान्यता मिळाली आहे. यापूर्वी दरवर्षी ही प्रक्रिया करावी लागत असे. त्याचप्रमाणे विद्यापीठास स्वतःचे संचलित महाविद्यालय चालवावयाचे असल्यास त्यास मान्यता मिळू शकते. विद्यापीठ आता ऑनलाईन अभ्यासक्रम राबविण्यासही पात्र ठरले असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

तरुण भारत

# विद्यापीठाला युजीसीकडून 'कॅटेगरी-१' दर्जा बहाल

प्रतिनिधी

कोल्हापूर

■ कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांची माहिती

शिवाजी विद्यापीठाला नुकताच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने 'कॅटेगरी-१' विद्यापीठाचा दर्जा बहाल करण्यात आला आहे. त्यामुळे दूरशिक्षण विभागाला पाच वर्षांची मान्यता मिळाली आहे, अशी माहिती कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) विद्यापीठांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याचा निर्णय २०१८मध्ये घेतला. त्यानुसार 'नॅक' (बंगळूर) यांचे ३.५१ सीजीपीए गुणांकन आणि त्यावरील गुणांकनप्राप्त विद्यापीठांसाठी 'कॅटेगरी-१', ३.२६ ते ३.५० या दरम्यान गुणांकनप्राप्त विद्यापीठे 'कॅटेगरी-२' आणि त्याव्यतिरिक्त सर्व विद्यापीठे 'कॅटेगरी-३' अशी ही श्रेणीरचना करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाला नॅकच्या ३.५२ सीजीपीए गुणांकनासह 'एप्लसप्लस' मानांकन मिळाले आहे. त्यामुळे युजीसीकडून विद्यापीठाला 'कॅटेगरी-१' दर्जा प्रदान करण्यात आला आहे. यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनेकविविध सोयीसुविधा प्राप्त होण्यास विद्यापीठ पात्र ठरले आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राला युजीसीकडून सलग पाच वर्षांसाठी मान्यता मिळाली. यापूर्वी दरवर्षी ही प्रक्रिया करावी लागायची. आता दरवर्षी मान्यता घ्यावी लागणार नाही. विद्यापीठास स्वत:चे संचलित महाविद्यालय चालवावयाचे असेल तर मान्यता मिळू शकते. शिवाजी विद्यापीठ आता ऑनलाईन अभ्यासक्रम राबविण्यास पात्र ठरले आहे. त्यानुसार विद्यापीठ आता पुढे जात असून आवश्यक कन्टेन्ट विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. नजीकच्या काळात याचे आणखीही लाभ शिवाजी विद्यापीठाला पर्यायाने विद्यार्थ्यांना होतील.

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठास 'युजीसी'कडून 'कॅटेगरी-१' दर्जा बहाल

**कोल्हापूर, ता.२७(प्रतिनिधी)** - शिवाजी विद्यापीठाला नुकताच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने 'कॅटेगरी-१' विद्यापीठाचा दर्जा बहाल करण्यात आला असल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के पुढे म्हणाले की, विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) विद्यापीठांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याचा निर्णय २०१८ मध्ये घेतला. त्यानुसार 'नॅक' (बंगळूर) यांचे ३.५१ सीजीपीए गुणांकन आणि त्यावरील गुणांकनप्राप्त विद्यापीठांसाठी 'कॅटेगरी-१', ३.२६ ते ३.५० या दरम्यान गुणांकनप्राप्त विद्यापीठे 'कॅटेगरी-२' आणि त्याव्यतिरिक्त सर्व विद्यापीठे 'कॅटेगरी-३' अशी ही श्रेणीरचना करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठाला नॅकच्या ३.५२ सीजीपीए गुणांकनासह मानांकन प्राप्त झाले आहे. त्यामुळे युजीसीकडून विद्यापीठाला 'कॅटेगरी-१' दर्जा प्रदान करण्यात आला आहे. यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनेकविध सोयीसुविधा प्राप्त होण्यास विद्यापीठ पात्र ठरले आहे.

# दिल्ली संचलनाची आजपासून निवड चाचणी : डॉ. शिर्के

## राज्यातील विद्यापीठांच्या स्वयंसेवकांचा सहभाग

**कोल्हापूर, ता. २७ :** शिवाजी विद्यापीठात २८ ते ३० सप्टेंबर या कालावधीत राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन (एनआरडी), (एसआरडी) निवड चाचणी होणार आहे. राज्यातील सर्व विद्यापीठांतून राष्ट्रीय सेवा योजनेचे ३१२ स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. स्वयंसेवकांमधून प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी निवड केली जाईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, की यंदा राज्यातील स्वयंसेवकांची निवड शिवाजी विद्यापीठात होणार आहे. यासाठी राज्यातील स्वयंसेवक शिवाजी विद्यापीठात येणार आहेत. त्यातील ५६ विद्यार्थी हे पश्चिम विभागीय संचलनासाठी निवडले जातील. यातून १४ विद्यार्थी हे दिल्ली येथे होणाऱ्या संचलनासाठी पाठवले जातील. उर्वरित स्वयंसेवकांमध्ये ३१२ मधून आणखी ३८ जणांची निवड करून त्यांना मुंबई येथे होणाऱ्या पथसंचलनासाठी निवडले जाणार आहे. या निवड चाचणीत शिवाजी विद्यापीठातील १२ मुले आणि १२ मुली, असे २४ स्वयंसेवक सहभागी होतील.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. व्ही. एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभये, मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.

**निवड समिती**

निवड समितीत क्षेत्रीय संचालक डॉ. कार्तिकेयन, राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनजे, अजय शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. अभय जायभाये यांचा समावेश आहे.

**विद्यापीठाला कॅटॅगिरी वन दर्जा**

'नॅकच्या 'ए', प्लस, प्लस मानांकनामुळे आता शिवाजी विद्यापीठाला कॅटॅगिरी वनचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे दूर शिक्षणचे सर्व अभ्यासक्रम आणि दूर शिक्षणचा एम. बी. ए. अभ्यासक्रम आता पाच वर्षांसाठी वैध झाला असून, दरवर्षी त्यासाठी आता परवानगीची आवश्यकता लागणार नाही. असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

28 SEP 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणी

## कुलगुरू शिर्के : शिवाजी विद्यापीठात आजपासून तीन दिवस शिबिर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात बुधवार, दि. २८ सप्टेंबरपासून ३० सप्टेंबरपर्यंत तीन दिवसीय राष्ट्रीय, राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्षासाठी ही निवड चाचणी असल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली. यापूर्वी शिवाजी विद्यापीठामध्ये २००६ व २०१६ या सालामध्ये ही निवड शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिबिरामध्ये महाराष्ट्रातील २९ विद्यापीठांमधून एकूण ३१० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत. यामध्ये १५३ मुले, १५७ मुली, ११ पुरुष कार्यक्रम अधिकारी व १० महिला कार्यक्रम अधिकारी सहभागी होणार आहेत. या शिबिरात विद्यार्थ्यांची परेड, वजन, उंची, मुलाखत, इत्यादींच्या माध्यमातून निवड प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. या निवड चाचणी शिबिराच्या माध्यमातून ३१२ विद्यार्थ्यांमधून ५६ विद्यार्थी पश्चिम विभागीय संचलनासाठी, १४ विद्यार्थी राष्ट्रीय पथसंचलनासाठी निवडले जाणार आहेत आणि उर्वरित ४२ विद्यार्थ्यांमध्ये आणखी ३८ विद्यार्थ्यांची निवड करून एकूण ८० विद्यार्थी राज्यस्तरीय पथसंचलनासाठी निवडले जाणार आहेत. शिवाजी विद्यापीठातून या शिबिरासाठी १२ मुली व १२ मुले, असा २४ स्वयंसेवकांचा संघ सहभागी होणार आहे. डॉ. एन. बी. माने व डॉ. सुनीता तेलशिंगे यांची संघ व्यवस्थापक म्हणून निवड केली आहे. पत्रकार परिषदेस प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये, मास कम्युनिकेशन विभाग समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवार (दि. २८) पासून तीनदिवसीय राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात राज्यातील २९ विद्यापीठांमधून ३१० विद्यार्थी-विद्यार्थिनी, पुरुष, महिला कार्यक्रम अधिकारी सहभागी होणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली. शिबिरात सहभागी स्वयंसेवक विद्यार्थ्यांसाठी राहण्याची निवासाची व्यवस्था केली आहे. बाहेरील विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची वाहतूक व्यवस्था डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाने केली आहे. त्यांची बस कोल्हापूर सेंट्रल बस स्टेशन ते विद्यापीठपर्यंत असतील.

28 SEP 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याकडून स्तुती कार्यक्रमाचे कौतुक

## 'मेक इन इंडिया'मध्ये सहभागी व्हावे : डॉ. आर. जी. सोनकवडे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी ॲण्ड सायन्स, पिलानी, गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे उद्घाटन २६ रोजी झाले. या कार्यक्रमासाठी गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मुख्य अतिथी म्हणून स्तुतीचे समन्वयक शिवाजी विद्यापीठाचे प्रा. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.

स्तुती कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक भारतभर वाढत आहे. कोल्हापूर आता भारताच्या अगदी काश्मीरपासून वेल्लोरपर्यंत पोहोचले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सात दिवस विविध प्राध्यापक मंडळी अतिशय प्रगतशील उपकरणावर तांत्रिक बाबींची माहिती सर्वांना देणार आहेत. स्तुती प्रशिक्षण



कोल्हापूर : स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. सुनील भांड, प्रा. सोनकवडे, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, प्रा. सुमन कुंडू, प्रा. मीनल कौशिक.

कार्यक्रम उद्घाटनप्रसंगी प्राध्यापक सुनील भांड, प्रा. सुमन कुंडू प्रा. मीनल कौशिक आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी समाजात व्यवसाय म्हणून नवोपक्रमाची स्वीकारार्हता वाढली पाहिजे, असे प्रतिपादन केले. तसेच स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमच्या उपक्रमाबद्दल भारताचा विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग, पिलानी गोवा परिसर आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे अभिनंदन केले.

डॉ. प्रा. राजेंद्र सोनकवडे यांनी अत्याधुनिक उपकरणांच्या उपयुक्तेबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. आता संशोधक प्राध्यापक आणि उद्योजकांनी एकत्र येऊन मेक इन इंडियामध्ये सहभागी व्हावे आणि अत्याधुनिक साधने विकसित करण्याचा प्रयत्न करावा, असे मतही व्यक्त केले.

लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची निवडणूक जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची निवडणूक जाहीर करण्यात आला असून १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची निवडणूक हालचाल सुरू झाली आहे. विद्यापीठ विकास मंच व विद्यापीठ विकास आघाडी तसेच समविचारी संघटना, विद्यार्थी संघटना, राजकीय पक्ष यांनी तयारी सुरू केली आहे. २१ सप्टेंबर रोजी तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध होणार असून १२ ऑक्टोबर रोजी अंतिम यादी प्रसिद्ध होणार आहे. २८ ऑक्टोबर उमेदवारी अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिवस आहे. १६ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीसाठी महाविद्यालयीन शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर, प्राचार्य प्रत्येकी १०, संस्थाचालक ६, शिक्षकेतर कर्मचारी १, विद्यापीठ अधिविभाग, प्रशासन कर्मचारी १, विद्यापीठ प्राध्यापक ३ अशा जागा असतील. याखेरीस राज्यपाल नियुक्त प्रतिनिधी १०, विधान परिषद २, विधानसभा १, स्थानिक स्वराज्य संस्था १ अशाही जागा आहेत.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठातर्फे स्टार्टअप स्पर्धा

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नावीन्यता विभागाद्वारे स्टार्टअप शिबिर आणि स्पर्धेचे आयोजन केले आहे. शिबिरात नोंदणी केलेल्या नवउद्योजकांच्या संकल्पनांची सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर सर्वोत्तम कल्पना सादर करणाऱ्यांना प्रथम पारितोषिक २५ हजार, द्वितीय पारितोषिक पंधरा हजार, तृतीय पारितोषिक दहा हजार रुपयांपर्यंतची पारितोषिके दिली जाणार आहेत. प्रत्येक सत्रातील उत्तम १० कल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण तज्ज्ञ समितीसमोर करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय विजेत्यांना १ लाख रुपयांपर्यंतचे रोख अनुदान, तसेच आवश्यक पाठबळही पुरविण्यात येईल. सहभाग नोंदविण्यासाठी www.msins.in किंवा www.mahastartupyatra.in या संकेतस्थळाशी संपर्क साधावा.